ePaper
मोदी सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय; रेशन योजनेत 3 मोठ्या सुधारणा

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार | दि. 28 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


पान 2 वरुन...

एनडीए परेडमध्ये दिसणार 'सारंग'चा थरार

## देशात बनतंय 'मेड इन इंडिया' फायटर जेट; हवाई दलाची ताकद वाढणार!

# भारताला नडणाऱ्यांची आता खैर नाही!

महाईन्यूज ।
नवी दिल्ली

**भारताने आपल्या सर्वात महत्त्वाकांक्षी संरक्षण प्रकल्पांपैकी एक असलेल्या एएमसीए प्रकल्पाबाबत एक ऐतिहासिक आणि मोठा निर्णय घेतला. संरक्षण मंत्रालयाने पहिल्यांदाच या पाचव्या पिढीच्या स्टील्थ फायटर जेटचा प्रोटोटाइप तयार करण्यासाठी थेट खासगी कंपन्यांकडून प्रस्ताव मागवले. या प्रकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, सरकार यावेळी केवळ हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडवर अवलंबून न राहता खासगी क्षेत्राला मोठी संधी देत आहे.**




रोनॉटिकल डेव्हलपमेंट एजन्सीने यासाठी अनेक कंपनीला आमंत्रित केले असून, निवडल्या जाणाऱ्या कंपनीकडे संपूर्ण विमानाच्या निर्मितीची जबाबदारी सोपवली जाईल. एएमसीए हा भारताचा पहिला पाचव्या पिढीचा स्टील्थ फायटर जेट असेल. शत्रूच्या रडारला चकवा देणे, हे या विमानाची खासियत असेल. या विमानाची तुलना अमेरिकेचे एफ-३५, चीनचे जे- ३५ आणि रशियाचे सू-५७ यांसारख्या जगातील सर्वात आधुनिक लढाऊ विमानांशी केली जात आहे.




रडारच्या नजरेतून वाचण्यासाठी एएमसीएमध्ये विशेष प्रकारच्या मटेरिअल आणि डिझाईनचा वापर केला जाईल. तसेच, या विमानाची शस्त्रे बाहेर न ठेवता विमानाच्या आतच ठेवली जातील, ज्यामुळे रडारवर हे विमान शोधणे अशक्य होईल. याच वैशिष्ट्यामुळे याला घोस्ट फायटर असेही म्हटले जात आहे.

याशिवाय, निवडलेल्या कंपनीला एअरफ्रेम, इंजिन सिस्टम, इलेक्ट्रॉनिक्स, फ्युअल सिस्टम आणि फ्लाईट कंट्रोलसह संपूर्ण विमान एकाच इंटीग्रेटेड प्लॅटफॉर्मवर विकसित करावे लागणार आहे. 'आत्मनिर्भर भारत'च्या दिशेने टाकलेले हे पाऊल भारतीय संरक्षण क्षेत्रासाठी ऐतिहासिक ठरणार असून, एएमसीएच्या माध्यमातून भारत जागतिक महासत्तांच्या आधुनिक लढाऊ विमानांच्या स्पर्धेत दमदार उपस्थिती नोंदवणार आहे.

### भारतासाठी गेम चेंजर प्रकल्प

हा प्रकल्प यशस्वी झाल्यास भारत स्वतःचे पाचव्या पिढीचे स्टील्थ फायटर जेट डिझाईन आणि विकसित करणाऱ्या जगातील मोजक्या देशांच्या पंक्तीत सामील होईल. भारताच्या संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या दिशेने हे एक अत्यंत क्रांतिकारी पाऊल मानले जात आहे.

### भारतीय वायुसेनेसाठी का महत्त्वाचा?

सध्या भारतीय वायुसेना लढाऊ विमानांच्या कमतरतेचा सामना करत आहे. वायुसेनेला सध्या ४२ स्क्वाड्रनची गरज असताना प्रत्यक्षात केवळ ३० स्क्वाड्रन उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत, भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी एएमसीए भारतीय वायू दलाची ताकद अनेक पटींनी वाढवणार आहे.

# एनडीए परेडमध्ये दिसणार ‘सारंग’चा थरार

## जीएसटी व प्राप्तिकर संकलनात आघाडीवर असलेले पुणे पुढील दशकात भारताचे ग्रोथ इंजिन ठरण्याची शक्यता

**महाईन्यूज । पुणे**

**राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए ) ऐतिहासिक १५० व्या तुकडीच्या 'दीक्षांत संचलन' ( पासिंग आऊट परेड ) सोहळ्याचा एक भाग म्हणून, 'सारंग' हेलिकॉप्टरचे चित्तथरारक प्रदर्शन होणार आहे. हा कार्यक्रम 29मे रोजी होणार असल्याने सारंग च्या प्रत्यक्षिकाचा सराव सुरु आहे.**



यंदा एनडीए मधून पदवी प्राप्त करणाऱ्या महिला कॅडेट्सची तिसरी तुकडी सहभागी होत आहे. ज्यामुळे सशस्त्र दलांमध्ये लिंग-समावेशकतेच्या (जेन्डर इंटिग्रेशन ) प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. लष्करी परंपरा आणि उत्कृष्टतेच्या या पार्श्वभूमीवर, 'सारंग' पथक आपल्या आकर्षक रंगांनी सजलेल्या हेलिकॉप्टर्ससह चित्तथरारक 'फॉर्मेशन फ्लाइंग', हवाई अचूकता आणि कसबपूर्ण हवाई कसरतींचे प्रदर्शन करेल.

भारतीय वायुदलाचे अग्रणी दूत ('ब्रँड ॲम्बेसेडर्स ) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'सारंग' पथकाने भारतासह विदेशांत दिलेल्या नेत्रदीपक प्रदर्शनांच्या समृद्ध वारशाच्या जोरावर मोठी लोकप्रियता आणि गौरव प्राप्त केला आहे. या पथकाने २००४ मध्ये सिंगापूर येथे आयोजित 'एशियन एरोस्पेस शो'मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर पदार्पण केले. तेव्हापासून, त्यांनी जगभरातील ३९० हून अधिक ठिकाणी १,२०० हून अधिक हवाई प्रदर्शने सादर केली आहेत.

'हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड' या भारतीय कंपनीने (एचएएल ) द्वारे स्वदेशी बनावटीचे विकसित केलेले 'ॲडव्हान्स्ड लाइट हेलिकॉप्टर' (एएलएच ) 'ध्रुव' चालवते. सर्व प्रकारच्या हवामानात आणि विविध मोहिमांसाठी सक्षम असलेले हे 'एएलएच ध्रुव' हेलिकॉप्टर, भारताची वाढती हवाई-अंतराळ क्षमता दर्शवते आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेचे मूर्तिमंत प्रतीक ठरते.

'सारंग' पथक 'एएलएच-एमके 1' या अत्यंत चपळ आणि कुशलतेने हाताळता येणाऱ्या प्रकाराचे उड्डाण करते. हे पथक २९ मे २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजल्यापासून, एनडीए खडकवाला येथील प्रतिष्ठित 'सुदान ब्लॉक' आणि 'सलारिया चौक' या परिसरावर आपले हवाई प्रदर्शन सादर करेल. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी अर्थात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी येथे यंदाच्या पदवीदान समारंभात महिला कॅडेट्सच्या तिसऱ्या तुकडीचा सहभाग विशेष आकर्षण ठरणार आहे. सशस्त्र दलांमध्ये लिंग-समावेशकतेच्या दिशेने टाकलेले हे आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात असून, भारतीय संरक्षण व्यवस्थेतील बदलत्या आणि प्रगत विचारांचे ते प्रतीक ठरत आहे.

या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर भारतीय वायुदलाचे प्रसिद्ध सारंग हेलिकॉप्टर प्रदर्शन पथक आपल्या थरारक हवाई कसरतींनी उपस्थितांना मंत्रमुग्ध करणार आहे. आकर्षक रंगांनी सजलेल्या हेलिकॉप्टर्सच्या साहाय्याने ‘फॉर्मेशन फ्लाइंग’, अचूक हवाई नियंत्रण आणि कसबपूर्ण कसरतींचे सादरीकरण करण्यात येणार आहे. भारतीय वायुदलाचे ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पथकाने देश-विदेशात आपल्या नेत्रदीपक प्रदर्शनांनी विशेष लोकप्रियता मिळवली आहे.

### हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड निर्मित स्वदेशी ध्रुव प्रगत हलके हेलिकॉप्टर

‘सारंग’ पथकाने २००४ मध्ये सिंगापूर येथे आयोजित ‘एशियन एरोस्पेस शो’मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर पदार्पण केले होते. त्यानंतर जगभरातील ३९० हून अधिक ठिकाणी तब्बल १,२०० पेक्षा अधिक हवाई प्रदर्शने सादर करत त्यांनी भारतीय वायुदलाची क्षमता जागतिक स्तरावर अधोरेखित केली आहे. हे पथक हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड निर्मित स्वदेशी ध्रुव प्रगत हलके हेलिकॉप्टर हेलिकॉप्टरचे उड्डाण करते. सर्व प्रकारच्या हवामानात कार्यक्षम असलेले ‘एएलएच ध्रुव’ हे भारताच्या वाढत्या हवाई-अंतराळ सामर्थ्याचे आणि ‘आत्मनिर्भर भारत’ संकल्पनेचे प्रतीक मानले जाते.

---

# “मक्तेदारी संपणार!” पुणे महापालिकेत ठेकेदारांना फक्त 2 कंत्राटांची मर्यादा

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेच्या हद्दीतील रस्त्यांचे झाडणकामाचे कंत्राट हे चिठ्ठी पद्धतीने काढले जात होते. या पद्धतीमुळे एकाच ठेकेदाराला अनेक कामे मिळून कामाच्या दर्जावर परिणाम होत होता. त्यामुळे यापुढे कोणत्याही एका ठेकेदाराला झाडणकामाची जास्तीत जास्त दोनच कामे दिली जातील, असा निर्णय घनकचरा विभागाने घेतल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी दिली.**




महानगरपालिकेच्या 15 क्षेत्रीय कार्यालयांतर्गत रस्ते झाडणकामासाठी मनुष्यबळ पुरविण्याकरिता निविदा प्रक्रिया राबवली जाते. क्षेत्रीय कार्यालयस्तरावर काढण्यात येणाऱ्या या निविदा चिठ्ठी पद्धतीने काढल्या जात होत्या. या प्रक्रियेमध्ये एकाच ठेकेदाराला अनेक प्रभागांमधील कामांचे कंत्राट मिळत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. यामुळे कामाच्या गुणवत्तेवर देखील परिणाम होत होता.

एकाच ठेकेदाराकडे क्षमतेपेक्षा जास्त आणि अत्याधिक कामांचा भार आल्यामुळे कामांचे योग्य नियोजन करणे, मनुष्यबळ पुरविणे आणि कामाच्या गुणवत्तेवर प्रभावी नियंत्रण ठेवणे कंत्राटदाराला अशक्य होत होते. याचा थेट परिणाम शहराच्या स्वच्छतेवर आणि कामाच्या दर्जावर होत होता. रस्त्यांवर कचरा तसाच पडून राहण्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली होती. महापालिकेच्या या निर्णयामुळे कंत्राट क्षेत्रात नव्याने येऊ इच्छिणाऱ्या आणि प्रामाणिकपणे काम करणाऱ्या इतर ठेकेदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. निविदा प्रक्रियेमध्ये कमालीची पारदर्शकता राहून सर्व कंत्राटदारांना स्पर्धेत उतरण्याची समान संधी उपलब्ध होईल. यामुळे शहराच्या स्वच्छतेचा दर्जाही कायम राखला जाणार आहे.

### ठेकेदारांची मक्तेदारी आता येणार संपुष्टात

झाडणकामामध्ये ठेकेदाराची जबाबदारी ही मनुष्यबळ पुरविण्याइतपतच मर्यादित असते. परंतु, त्यांच्या कामावर देखरेख ठेवणे, उपस्थिती व कामाचा दर्जा, यावरचे नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडेच असते. काहीवेळा दुर्लक्षामुळे तर काही वेळा अर्थपूर्ण संबंधांमुळे मनुष्यबळ कामावर नसतानाही बिले निघतात तसेच कामाची गुणवत्ताही राखली जात नाही. दुसरीकडे एकाच ठेकेदाराला अधिक कामे दिली गेली, तर त्याची मक्तेदारी निर्माण होते. त्याचाही परिणाम कामाच्या दर्जावर होतो. त्यामुळेच महापालिकेने हा निर्णय घेतला आहे.

“ झाडणकामाकरिता मनुष्यबळ पुरविणाऱ्या कोणत्याही ठेकेदाराला दोनपेक्षा अधिक कामे (कंत्राट) देता येणार नाहीत. या निर्णयामुळे कामांचे कंत्राटदारांमार्फत योग्य नियोजन करणे आणि मनुष्यबळाचे प्रभावी व्यवस्थापन करणे सोपे होणार आहे. तसेच, शहराची स्वच्छता देखील आता चांगल्या पद्धतीने होईल, याची काळजी घेतली जाणार आहे.

- प्रजित नायर, अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका.

# महापौरांचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा

## अर्जित रजा २४ मे रोजी संपल्यानंतरही मुख्य लेखा अधिकारी प्रवीण जैन यांनी पुन्हा रुजू होणे टाळले

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**बोगस उपसूचनांच्या आधारे ठेकेदारांना ६० कोटींची देयके दिल्याचा व ठेवींच्या गुंतवणुकीस विलंब केल्याने आर्थिक नुकसान झाल्याचा बोगस उपसूचना प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीने ठेवलेला ठपका आणि जबरदस्तीने रुजू होण्याचा प्रयत्न केल्यास गुन्हा दाखल करण्याचा महापौरांनी दिलेला इशारा या पार्श्वभूमीवर मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी पुन्हा रुजू होणे टाळले.**



अर्जित रजा २४ मे रोजी संपल्यानंतरही जैन रुजू झाले नाहीत. दालनातील साहित्यही बुधवारी त्यांनी घरी नेले आहे. त्यामुळे मुख्य लेखा व वित्त अधिकारीपदासाठी रस्सीखेच निर्माण झाली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या लेखा विभागाने २०२५-२६ या अर्थसंकल्पामध्ये १४ बोगस उपसूचनांच्या आधारे संबंधित कामाच्या तरदुतीमध्ये वाढ-घट करुन ६० कोटी १८ लाखांची देयके ठेकेदारांना दिली आहेत. ठरावीक दिवसांसाठीच महापालिकेच्या ठेवी ठेवल्याने आणि ठेवींची पुनर्गुंतवणूक करताना विलंब केल्याने व्याजातून मिळणाऱ्या ४० लाख ५७ हजार ६४३ रुपयांचे नुकसान झाल्याचे चौकशीतून उघडकीस आले. याला मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांना जबाबदार धरण्यात आले आहे. जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले होते.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) त्यांचा सक्तीच्या रजेचा आदेश रद्द केला होता. त्यानंतर जैन हे २४ मे पर्यंत अर्जित रजेवर गेले होते. परंतु, रजा संपल्यानंतरही २५ मे रुजू ते पुन्हा महापालिकेत रुजू झाले नाहीत. लेखा अधिकारी म्हणून पुन्हा ते चालणार नसून बळजबरीने महापालिकेत येण्याचा प्रयत्न केल्यास गुन्हा दाखल करण्याचा इशारा महापौर रवी लांडगे यांनी दिला होता. या पार्श्वभूमीवर जैन यांनी रुजू होणे टाळले. बुधवारी जैन यांनी महापालिकेतील दालनातील साहित्य शिपायामार्फत घरी नेले आहे. त्यामुळे आता नवीन लेखा अधिकारी येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन २४ मे पर्यंत अर्जित रजेवर होते. त्यांची रजा संपली आहे. ते पुन्हा रुजू झाले नाहीत, असे सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त संदीप खोत यांनी सांगितले.

दरम्यान, महापालिकेतील आर्थिक व्यवहारांवरून प्रशासन आणि सत्ताधारी पदाधिकाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. लेखा विभागातील कथित अनियमिततेमुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी स्वतंत्र समिती नियुक्त करण्याबाबतही चर्चा सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. महापालिकेच्या आर्थिक शिस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने विरोधकांनीही प्रशासनाला धारेवर धरले आहे. दरम्यान, नवीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी कोण होणार याकडे महापालिका वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### आयुक्तांकडून मर्जीतील अधिकारी आणण्यासाठी प्रयत्न?

बोगस उपसूचना प्रकरणामुळे लेखा विभाग, महापालिकेची बदनामी झाली आहे. त्यामुळे आर्थिक शिस्त आवश्यक आहे. त्यासाठी अनुभवी अधिकारी नियुक्त करण्याची पदाधिकाऱ्यांची मागणी आहे. परंतु, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी एका महापालिकेत बरोबर काम केलेल्या विश्वासू अधिकाऱ्याच्या नियुक्तीसाठी प्रयत्न सुरु केल्याचे सूत्रांनी सांगितले. मात्र, महापालिकेचे पद संचालक दर्जाचे असून संबंधित अधिकारी सह संचालक आहेत. प्रशासनाकडून या प्रकरणात पारदर्शक कारवाई होणार का, याबाबत नागरिकांमध्येही उत्सुकता निर्माण झाली आहे.

# चिखली-मोशीमध्ये झाडांच्या बुंध्यांभोवती कॉँक्रिटीकरणामुळे पर्यावरणप्रेमी संतप्त

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात सध्या पडणाऱ्या कडक उन्हामुळे आणि वाढत्या तापमानामुळे नागरिक कमालीचे हैराण झाले आहेत. अशा अत्यंत संवेदनशील परिस्थितीत, मानवी जीवनाला आणि पर्यावरणाला संजीवनी देणाऱ्या वृक्षांचे रक्षण करणे काळाची गरज असताना, पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून मात्र अगदी याउलट आणि संतापजनक प्रकार सुरू असल्याचे समोर आले आहे. झाडांच्या बुंध्याजवळच कॉँक्रिटीकरण केल्याने जणू काही हे झाडे आयुक्तसाहेब आम्हालाही तुमच्यासाठी जगू द्या, असा आक्रोश करताना दिसून येत आहेत.**





पृथ्वीतलावर माणसाला जगण्यासाठी ऑक्सिजनची गरज आहे. तो झाडांपासून मिळतो. परंतु, महापालिका शहराचा विकास साधताना या झाडांवर अप्रत्येक्षरित्या कुऱ्हाड चालवत तर नाही ना, असा संतप्त सवाल नागरिक व पर्यावरणप्रेमी करत आहेत. चिखली-मोशी परिसरातील मुख्य रस्त्यांच्या बाजूला असलेल्या झाडांच्या बुंध्याभोवती पालिकेच्या वतीने थेट कॉंक्रिटीकरण करण्यात आले आहे. रस्त्यांचे आणि पदपथांचे काम करताना झाडांच्या मुळांना पाणी मुरण्यासाठी अगदी थोडीही जागा न सोडता, संपूर्ण परिसर सिमेंट आणि कॉंक्रीटने बुजवून टाकण्यात आला आहे. महापालिकेच्या या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या आणि बेजबाबदार कामाचा नमुना सध्या या परिसरात पाहायला मिळत आहे.

झाडांच्या आजूबाजूला अशा प्रकारे कॉंक्रिटीकरण केल्यामुळे भविष्यात या वृक्षांना पाणी न मिळाल्याने ती पूर्णतः कोरडी पडून जळून जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. एकीकडे जागतिक तापमानवाढीबाबत चिंता व्यक्त केली जात असताना, दुसरीकडे स्वतः प्रशासनच या झाडांचा गळा घोटण्याचे काम करत असल्याने स्थानिक पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांमधून तीव संताप व्यक्त होत आहे. सध्या वातावरणातील तापमान प्रचंड वाढले असून, सामान्य माणसाचे जगणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत मानवी जीवनाला जीवनदान देणाऱ्या वृक्षांचे जतन करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. परंतु, पिंपरी-चिंचवड महापालिका चिखली-मोशी परिसरातील झाडांच्या बाजूला पूर्णतः कॉंक्रिटीकरण करून या निष्पाप वृक्षांचा जीव घेण्याचे काम करत आहे. हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून, प्रशासनाने तात्काळ हे कॉंक्रीट काढून झाडांना मोकळा श्वास घेऊ द्यावा, अन्यथा भविष्यात ही सर्व झाडे नष्ट होतील, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

### राक्षसी विकासच पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत

महापालिकेच्या व शासनाच्या वतीने ‘झाडे लावा देश जगवा’ असा उपक्रम राबविला जातो. परंतु, प्रत्यक्षात महापालिकेचा विकासच झाडांच्या मुळावर घाव घालत असेल तर सर्वसामान्य नागरिकांनी काय आदर्श घ्यायचा, असा प्रश्न नागरिक करत आहेत. मोठमोठ्या झाडांच्या बुंद्याभोवती सिमेंट टाकून पॅक केल्याने पाण्याविना ही झाडे जळून जातील. एक तर सिमेंटचे रस्ते, डांबरीकरण यामुळे जमिनीत पाणी मुरत नाही. त्यात बुंद्याभोवती काँक्रिटीकरण केल्याने झाडांनी कसे जगायचे, हा प्रश्न आहे. मानवाचा हा राक्षसी विकासच एक दिवस माणसाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरेल, अशी भावना ज्येष्ठ नागरिक, पर्यावरणप्रेमी व्यक्त करत आहेत.



## भूमिका

**कर्नाटकातील काँग्रेस सरकारभोवती निर्माण झालेला नेतृत्वबदलाचा पेच हा केवळ सिद्धरामय्या विरुद्ध डी. के. शिवकुमार असा साधा संघर्ष नाही; तर तो कर्नाटकाच्या गेल्या तीन, चार दशकांच्या राजकीय इतिहासातून निर्माण झालेला गुंतागुंतीचा प्रश्न आहे. तसाच काँग्रेससाठी राजकीय अस्थिरतेचा विषय राहिला आहे.**

# कर्नाटक खांदेपालटाचा संभ्रम



एस. एम. कृष्णा यांच्या काळात काँग्रेसने शहरीकरण, माहिती-तंत्रज्ञान आणि बंगळूरूचे जागतिकीकरण यावर भर दिला. पण 2004 मध्ये त्यांना बाजूला करताना पक्षाने स्पष्ट संदेश दिला की, दिल्ली नेतृत्वाच्या राजकारणात प्रादेशिक लोकप्रियतेपेक्षा अंतर्गत संतुलन अधिक महत्त्वाचे असते. कृष्णा यांच्यानंतर धर्मसिंग यांना मुख्यमंत्री करण्यात आले; मात्र संयुक्त सरकारच्या तडजोडीमुळे त्यांचे नेतृत्व कधीच स्थिर राहिले नाही. परिणामी जनता दल (सेक्युलर) आणि भाजपने त्या अस्थिरतेचा फायदा घेत सत्ता काबीज केली. काँग्रेसने काही वेळा नेतृत्वाचा प्रयोग केला तो वीराप्पा मोईली, एस. बंगारप्पा, एस. एम. कृष्णा, धर्मसिंग, मल्लिकार्जुन खर्गे यांसारख्या विविध सामाजिक गटांतील नेत्यांना पुढे करून. पण प्रत्येक वेळी अंतर्गत गटबाजीने काँग्रेसला मोठी किंमत मोजावी लागली. विशेषत: देवराज अर्स यांच्या काळानंतर ओबीसी नेतृत्व आणि पारंपरिक लिंगायत-वोक्कालिगा समीकरण यांच्यातील संघर्ष काँग्रेसला सतत त्रास देत राहिला. सिद्धरामय्या यांचे राजकारण याच पार्श्वभूमीवर उभे राहिले. ते स्वत: कुरुबा समाजातील प्रभावी ओबीसी नेता म्हणून पुढे आले आणि त्यांनी “अहिंद” सामाजिक समीकरण उभे करून काँग्रेसला नवसंजीवनी दिली. 2013 मध्ये काँग्रेसने सिद्धरामय्या यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवला आणि त्यांनी पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करून इतिहास घडवला. कर्नाटकात कार्यकाळ पूर्ण करणारे ते मोजके काँग्रेस मुख्यमंत्री ठरले. त्यामुळेच आजचा संघर्ष अधिक गुंतागुंतीचा आहे. सिद्धरामय्या यांच्याकडे सामाजिक आधार, प्रशासनाचा अनुभव आणि राष्ट्रीय पातळीवर ओबीसी चेहरा म्हणून स्वीकारार्हता आहे. दुसरीकडे डी. के. शिवकुमार हे संघटनशक्ती, आर्थिक व्यवस्थापन आणि वोक्कालिगा समाजातील प्रभाव यामुळे काँग्रेससाठी अपरिहार्य आहेत. 2023 मध्ये काँग्रेसने सत्ता मिळवली तेव्हा “सत्तावाटप” झाल्याच्या चर्चांनी सुरुवातीपासूनच सरकारला अस्थिरतेची किनार दिली. शिवकुमार समर्थकांनी अडीच वर्षांनंतर नेतृत्वबदल होईल, अशी अपेक्षा कायम ठेवली; तर सिद्धरामय्या समर्थकांनी त्यांच्या लोकप्रियतेचा दाखला देत पूर्ण कार्यकाळाची मागणी केली. आता सरकारला तीन वर्षे पूर्ण होताच दिल्लीतील बैठका, पोस्टरबाजी, मंत्र्यांच्या गाठीभेटी आणि राज्यसभेतील संभाव्य भूमिकांच्या चर्चांमुळे संघर्ष पुन्हा उफाळून आला आहे. या सगळ्या प्रक्रियेत काँग्रेससमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे “इतिहासाची पुनरावृत्ती” टाळणे. कर्नाटकात पूर्वी अनेकदा नेतृत्वबदलामुळे सरकारे कमकुवत झाली.

## प्रासंगिक »

### कोल्हा आणि कासव

**एकदा एका जंगलात एक कोल्हा राहत होता त्याला स्वतःच्या हुशारी बद्दल गर्व होता. तो म्हणत असे, "मी सर्व प्राण्यात हुशार आहे.**

एक दिवस तो अन्नाच्या शोधात निघाला. त्याला काही मिळाले नाही. त्याला भूक सहन झाली नाही. अखेर त्याला एक कासव दिसले. त्याला खुप आनंद झाला. त्याने उडी मारून कासवाला पकडले. कोल्ह्याने कासवाचे कवच फोडण्याचा प्रयत्न केला. पण ते काही फुटेना. कासव धुर्तपणे म्हणाले, "तु मला पाण्यात का बुडवत नाहीस? म्हणजे माझे कवच मऊ होईल व मला तु सहजपणे खाऊ शकशील." भुकेने व्याकुळ झालेल्या कोल्ह्याने, काही विचार न करता कासवाला तळ्यात ढकलले.

कासव कोल्ह्याच्या हातातून सहज निसटले व आनंदाने पाण्यात पोहू लागले. ते तळ्याच्या मध्यभागी गेले आणि म्हणाले, "कोल्ह्या स्वतःला फार हुशार समजू नकोस."

तात्पर्य - जसे पेराल तसेच उगवेल किवा जशास तसे.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीमध्ये बँकिंग क्षेत्राचे महत्त्व हे शरीरातील रक्ताभिसरण संस्थेसारखे आहे. परंतु, गेल्या काही दशकांपासून बुडीत कर्जांच्या म्हणजेच ‘एनपीए’च्या साठलेल्या थरांनी या यंत्रणेला ग्रासले होते.

# कर्ज बुडवेगिरीला चाप




भारतात २०१० नंतर हा प्रश्न अधिक गंभीर बनला; मोठ्या उद्योगसमूहांनी घेतलेली कर्जे परतफेडीअभावी अडकल्याने बँकांच्या ताळेबंदावर मोठा ताण निर्माण झाला. यावर जालीम उपाय म्हणून २०१६ मध्ये ‘दिवाळखोरी आणि नादारी संहिता’ अर्थात ‘आयबीसी’ कायदा अस्तित्वात आला. कर्ज बुडवून चैन करणाऱ्या प्रवृत्तींना या कायद्याने चाप लावला असला, तरी गेल्या दहा वर्षांच्या प्रवासात या प्रक्रियेला गंज चढू लागला होता.

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण म्हणजेच ‘एनसीएलटी’मध्ये रेंगाळणारी हजारो प्रकरणे, मालमत्तेच्या मूल्यामध्ये होणारी मोठी घट आणि कायदेशीर पळवाटांचा आधार घेऊन वेळेचा अपव्यय करणारे प्रवर्तक यामुळे बँकांचे कोट्यवधी रुपये अडकून पडले होते. हीच कोंडी फोडण्यासाठी केंद्र सरकारने ‘आयबीसी’मध्ये आमूलाग्र बदल सुचवणारी २०२६ ची दुरुस्ती आणली असून, ६ एप्रिल २०२६ रोजी राष्ट्रपतींची मोहोर उमटल्यानंतर आता भारतीय कर्जवसुली प्रक्रियेने एका नव्या युगात प्रवेश केला आहे. सध्याच्या ‘आयबीसी’ प्रक्रियेचा विचार केला तर ती प्रामुख्याने एखाद्या विशिष्ट कंपनीपुरती मर्यादित होती. जेव्हा एखादी कंपनी हप्ते थकवते, तेव्हा तिला नादारी प्रक्रियेत ओढले जाते आणि तिथे एक पुनर्रचना व्यावसायिक म्हणजेच ‘रिझोल्युशन प्रोफेशनल’ नियुक्त केला जातो. कायद्यानुसार ही प्रक्रिया १८० ते २७० दिवसांत पूर्ण होणे अपेक्षित होते; परंतु, अनेक मोठी प्रकरणे पाच-पाच वर्षे न्यायालयात अडकली होती; उदाहरणार्थ एस्सार स्टीलची प्रक्रिया ८०० दिवसांहून अधिक काळ चालली. यामुळे ज्या मालमत्तेची किंमत सुरुवातीला शंभर रुपये होती, ती कायदेशीर लढाई संपेपर्यंत दहा रुपयांवर येत होती. बँकांना मोठ्या प्रमाणात वसुलीच्या रकमेत कपात सोसावी लागत होती. या पार्श्वभूमीवर २०२६ ची दुरुस्ती ही केवळ नियमांची दुरुस्ती नसून तो संपूर्ण व्यवस्थेचा कायापालट करणारी प्रक्रिया ठरणार आहे. गेल्या दहा वर्षांतील आकडेवारीवर नजर टाकली तर ‘आयबीसी’च्या प्रभावाची व्याप्ती लक्षात येते. २०१६ पासून आत्तापर्यंत अंदाजे ७,५०० पेक्षा जास्त कंपन्या या प्रक्रियेतून गेल्या असून त्या माध्यमातून बँकांनी आतापर्यंत ३.५ लाख कोटी रुपयांहून अधिक रकमेची वसुली केली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



ओलें मूळ भेदी खडकाचें अंग ।
आभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥१॥

नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड ।
नाहीं कईवाड तोंच वरि ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाविकास आघाडी १७ जागा लढवणार

## विधान परिषदेच्या जागावाटपावर दोन दिवसात अंतिम निर्णय; जागावाटपाची प्राथमिक चर्चा

महाईन्यूज । मुंबई

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधान परिषदेवर निवडून द्यायच्या १६ जागा व नागपूरच्या एका जागेवरील पोटनिवडणूक अशा सर्व १७ जागा महाविकास आघाडी लढवणार आहे. यासाठी जागावाटपाची प्राथमिक चर्चा आज टिळक भवनमध्ये खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. दोन दिवसात पुन्हा एक बैठक घेऊ आणि सर्वसंमतीने जागा वाटपाचा निर्णय जाहीर करु, अशी माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.**




विधान परिषद निवडणुकीच्या जागा वाटपासाठी काँग्रेस पक्षाचे मुख्यालय टिळक भवन येथे महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प.) प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, शिवसेनेचे नेते आमदार अनिल परब, अंबादास दानवे, मिलिंद नार्वेकर उपस्थित होते.

बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, भाजपा लोकशाही मानत नाही, त्यांनी निवडणुकीत घोडेबाजार मांडला आहे, पैसा फेक तमाशा देख चा दुसरा अंक सुरु झाला असून ५ लाख रुपये आगाऊ देऊन नगरसेवकांची पळवापळवी केली जात आहे, अशा परिस्थितीत लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी महाविकास आघाडी एकजूटपणे विधान परिषदेची निवडणूक लढवणार आहे. मविआमध्ये जागा वाटपावरून कोणताही विसंवाद अथवा तिढा नाही तर सुसंवाद आहे, तर दुसरीकडे गँग्ज ऑफ ट्रिपल इंजिन सरकारमध्येच जागा वाटपावरून धुसफुस सुरु आहे, असेही सपकाळ म्हणाले.

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक मुंबईतील टिळक भवन येथे पार पडली. जागा वाटप आणि आगामी निवडणूक रणनीती यावर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, शिवसेना नेते आमदार अनिल परब, अंबादास दानवे तसेच मिलिंद नार्वेकर उपस्थित होते.

बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपावर जोरदार टीका केली. भाजपा लोकशाही मानत नसून निवडणुकीत घोडेबाजार सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. “पैसा फेक तमाशा देख” चा दुसरा अंक सुरू झाला असून नगरसेवकांची पळवापळवी करण्यासाठी लाखो रुपयांची ऑफर दिली जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी महाविकास आघाडी एकजुटीने विधान परिषद निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, महाविकास आघाडीत जागा वाटपावरून कोणताही तिढा नसून सर्व पक्षांमध्ये सुसंवाद असल्याचेही सपकाळ यांनी सांगितले. उलट महायुती सरकारमध्येच जागा वाटपावरून धुसफूस सुरू असल्याचा टोला त्यांनी लगावला. आगामी निवडणुकीत महाविकास आघाडी एकसंघ ताकद दाखवेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### शेतकऱ्यांच्या एकजूटीपुढे भाजपा सरकार हादरले

कांद्याला ३ हजार रुपये हमीभाव द्यावा या मागणीसाठी नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे महाविकास आघाडीने मोठे आंदोलन केले, तीन तास रास्ता रोको करण्यात आला. भाजपा महायुती सरकारने पोलिसांच्या माध्यमातून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला पण शेतकऱ्यांची एकजूट व ताकदी पाहून फडणवीस सरकार हादरले म्हणूनच आज तातडीने दिल्लीत केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्यासोबत कांदा प्रश्नावर बैठक होत आहे पण या बैठकीतून रिकाम्या हाताने परत येऊ नका, शेतकऱ्यांसाठी भरीव मदत घेऊनच या, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## पेट्रोल दरवाढीची चिंता मिटली! नितीन गडकरींची वाढदिवसानिमित्त देशवासियांना विशेष भेट

महाईन्यूज । नागपूर

**केंद्रीय नितीन गडकरी यांचा ६९ वा वाढदिवस विविध उपक्रम राबवून साजरा केला जात आहे. गडकरींना शुभेच्छा देण्यासाठी भेटायला येणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे.**



वाढदिवसाच्या दिवशी गडकरींनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना काही महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. यावेळी पेट्रोलच्या दरवाढीवर प्रश्न विचारला असता गडकरींनी चिंता व्यक्त करत दरवर्षी देशात २२ लाख कोटी रुपयांच्या कच्च्या तेलाची खरेदी केली जाते. ही आयात थांबली तर देशातील फार मोठा पैसा वाचणार आहे. यावर गडकरींनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त भन्नाट उपाय सूचवला आहे. यामुळे पेट्रोलच्या दरात कितीही वाढ झाली तरी चिंता राहणार नाही असा दावा आहे.

नितीन गडकरी यांनी सांगितले की, आपल्या देशामध्ये दरवर्षी २२ लाख कोटी रुपयांच्या कच्च्या तेलाची खरेदी केली जाते. त्यामुळे देशातील मोठा पैसा हा विदेशात जातो. हाच पैसा जर वाचवता आला तर देशातील युवकांच्या हाताला रोजगार देण्यासाठी त्याचा उपयोग होईल. त्यामुळे पेट्रोलवर पर्याय म्हणून इथेनॉलचा वापर करणे आवश्यक आहे. आता मारोती सुझुकी कंपनीने एक कार तयार केली असून ती १०० टक्के इथेनॉलवर चालणार आहे. जून महिन्यात ही कार बाजारात येणार आहे, असेही गडकरींनी सांगितले. याशिवाय नागपूर महापालिकेने एक प्रकल्प तयार केला असून जून महिन्यात त्याचे उद्घाटन आहे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींना बोलावण्याचा विचार असल्याचेही ते म्हणाले. या प्रकल्पातून कचऱ्यापासून २२ टन सीएनजी तयार केली जाणार आहे, अशी माहिती गडकरींनी दिली.

गडकरींनी पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला आहे. इथेनॉल आणि सीएनजी गाड्यांचा वापर वाढल्याने पेट्रोलवरील निर्भरता कमी होणार असून यापासून पर्यावरणाचे रक्षण होणार असेही ते म्हणाले. तसेच विविध शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांना सोबत घेऊन २५ लाख झाडांची लागवट करणार असल्याचेही गडकरींनी सांगितले.

देशातील इंधन संकट आणि वाढत्या पेट्रोल दरांवर पर्याय शोधण्याची वेळ आता आली आहे, असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. इथेनॉल आणि सीएनजीसारख्या पर्यायी इंधनामुळे भारत आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पेट्रोलवरील अवलंबित्व कमी झाल्यास देशाचा हजारो कोटी रुपयांचा परकीय चलन खर्च वाचणार असून त्याचा उपयोग रोजगारनिर्मितीसाठी होऊ शकतो, असेही त्यांनी सांगितले.

### वाढदिवसानिमित्त गडकरींचा संकल्प


गडकरींनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त एक संकल्प केला आहे. शहरातील एक लाख युवक आणि युवतींना सराव करता येईल इतक्या क्षमतेचे क्रिडांगण उभारण्याचा संकल्प गडकरींनी व्यक्त केला. हा संकल्प लवकरच पूर्णत्वास येणार असल्याचेही ते म्हणाले. याशिवाय शेतकरी आत्महत्या हा मोठा विषय आहे. यासाठी काम करणार असून शेतकऱ्यांना सेंद्रीय शेतीकडे वळवून त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही गडकरी म्हणाले.

# ममता बॅनर्जींना मोठा धक्का

## खासदार काकोली घोष यांचा TMC च्या सर्व संघटनात्मक पदांचा तडकाफडकी राजीनामा

**महाईन्यूज । पश्चिम बंगाल**

**पश्चिम बंगाल विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला मोठं यश मिळालं, तर ममता बॅनर्जी यांच्या टीएमसी पक्षाचा दारुण पराभव झाला. निवडणुकीनंतर भाजपाने सरकारही स्थापन केलं. दरम्यान, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसमध्ये मोठ्या राजकीय घडामोडी सुरू आहेत. तृणमूल काँग्रेसमधील अनेक खासदार, आमदार, नगरसेवक आणि पक्षातील काही नेते ममता बॅनर्जी यांच्यावर नाराज असल्याची चर्चा आहे.**



या नाराजीच्या कारणावरूनच जवळपास १०० पेक्षा जास्त नगरसेवकांनी राजीनामे दिल्याची माहिती समोर आली आहे.

असं असतानाच आता तृणमूल काँग्रेसला धक्का देणारी आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. तृणमूल काँग्रेसच्या खासदार काकोली घोष दस्तीदार यांनीही जाहीरपणे आपली नाराजी व्यक्त करत तृणमूल काँग्रेसच्या सर्व पदांचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. खासदार काकोली घोष दस्तीदार यांना ममता बॅनर्जी यांच्या निकटवर्तीय म्हणून ओळखलं जात होतं. मात्र, आता तृणमूलच्या सर्व पदांचा काकोली घोष यांनी अचानक राजीनामा दिला असून त्यांच्या राजीनाम्यामुळे ममता बॅनर्जी यांना मोठा धक्का बसला आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

खासदार काकोली घोष दस्तीदार या परगणा जिल्ह्यातील बारासात लोकसभा मतदारसंघामधून चार वेळा खासदार राहिल्या आहेत. मात्र, काकोली घोष दस्तीदार या पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एका महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित राहिल्या होत्या. त्यामुळे चर्चांना उधाण आलं होतं. त्या बैठकीच्या काही तासानंतर लगेच त्यांनी तृणमूल काँग्रेस पक्षाच्या सर्व संघटनात्मक पदांचा राजीनामा दिला असल्याचं बोललं जात आहे.

तसेच काकोली घोष दस्तीदार यांनी पश्चिम बंगाल तृणमूल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुब्रता बक्षी यांना एक पत्रही लिहिलं आहे. त्या पत्रात घोष यांनी म्हटलं की, "आपण विचार केल्यानंतरच पक्षाच्या सर्व संघटनात्मक पदांचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे.

### खासदारकीचा राजीनामा नाही

पश्चिम बंगाल विधानसभेच्या निवडणुकीतील पराभवानंतर खासदार काकोली घोष यांनी पहिल्यांदा तृणमूल काँग्रेसच्या सर्व संघटनात्मक पदांचा तडकाफडकी राजीनामा दिल्यामुळे ममता बॅनर्जी यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. कारण खासदार काकोली घोष यांनी उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील पक्ष संघटनेवर त्यांची चांगली पकड होती. तसेच त्यांनी संसदेतही अनेकदा भाजपाच्या विरोधात आवाज उठवत केंद्र सरकारवर टीका केली होती. दरम्यान, काकोली घोष दस्तीदार यांनी तृणमूल काँग्रेसच्या सर्व संघटनात्मक पदांचा राजीनामा दिला असला तरी खासदारकीचा राजीनामा अद्याप दिलेला नाही.

### काकोली घोष यांची तृणमूलवर अप्रत्यक्ष टीका

"रेशनमधील भ्रष्टाचार, शिक्षक भरतीमधील भ्रष्टाचारासह अनेक आर्थिक आणि प्रशासकीय अनियमिततांमुळे सर्वसामान्य लोकांच्या मनात तीव्र संताप आणि अविश्वास निर्माण झालेला आहे. याशिवाय आर.जी.कर मेडिकल कॉलेजमधील घटना आणि त्या घटनेभोवती संभाव्य लपवाछपवीच्या आरोपांनी सर्वांना वेदना आणि धक्का बसला आहे. या सर्व घटनांचा नैतिक परिणाम मी वैयक्तिकरित्या अनुभवला आहे", असं म्हणत काकोली घोष यांनी पक्षावर अप्रत्यक्ष टीका केली आहे.

# मोदी सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय; रेशन योजनेत 3 मोठ्या सुधारणा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पंतप्रधान गरीब कल्याण योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकार दर महिन्याला ८० कोटी लोकांना अन्नधान्याचा (रेशन) पुरवठा करत आहे. ही योजना योग्य पद्धतीनं सुरू ठेवण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळानं SARTHAK PDS योजना सुरू ठेवण्यास मंजुरी दिली आहे. या अंतर्गत काही मोठे बदल करण्यात आले आहेत. या सुधारणांचा लाभ गरीब कुटुंबांना होईल.**



या सुधारणांमुळे राज्यांना मदत होईल. सोबतच अन्नधान्याची चोरी रोखली जाईल.

सार्वजनिक वितरण व्यवस्था (पीडीएस) म्हणजेच अन्न पुरवठा व्यवस्था अधिक मजबूत, आधुनिक आणि पारदर्शक करण्याचा सरकारचा हेतू असल्याचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. यासाठी केंद्र सरकारनं २५,५३० कोटी रुपये मंजूर केले आहेत. या योजनेच्या अंतर्गत तीन विशेष बदल करण्यात आले आहेत.

**योजनेत तीन महत्त्वाचे बदल**

१.राज्यांना अन्न पुरवठ्यात मदत- राज्यांना आर्थिक मदत करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. अन्नधान्य गोदामातून दुकानापर्यंत पोहोचवण्यासाठी केंद्र सरकार राज्याच्या संबंधित विभागांना अर्थसहाय्य करेल. त्यामुळे वाहतूक खर्च कमी होईल आणि गरिबांपर्यंत अन्नधान्य वेळेत पोहोचेल. दुर्गम भागांना याचा सर्वाधिक लाभ होईल.

२. फेयर प्राइज शॉप- सरकार रेशन दुकानांनादेखील सहाय्य करणार आहे. यासाठी बऱ्याच कालावधीपासून मागणी केली जात होती, अशी माहिती वैष्णव यांनी दिली. रेशन दुकान धारकांना डिजिटल उपकरणं दिली जातील. अन्नधान्य व्यवस्थित साठवता यावं यासाठी रेशन दुकानदारांना मदत केली जाईल. यामुळे दुकानांचं जाळं आणि कार्यक्षमता वाढेल. रेशन पुरवठ्यातील अपहार, गोंधळ कमी होतील. रेशन दुकानदारांना आर्थिक सहाय्यदेखील दिलं जाऊ शकतं.

३.पीडीएसचं अत्याधुनिकीकरण- सार्वजनिक पुरवठा यंत्रणेचं आधुनिकीकरण करण्याचा सरकारचा मानस आहे. रेशन व्यवस्था आधुनिक करण्यासाठी तिला तंत्रज्ञानाची अधिकाधिक जोड दिली जाईल.

### अधिक पारदर्शकता आणि जबाबदारी निर्माण होणार

या सुधारणांमुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेत अधिक पारदर्शकता आणि जबाबदारी निर्माण होणार आहे. डिजिटल ट्रॅकिंगमुळे अन्नधान्याचा प्रत्येक टप्प्यावर मागोवा घेणे शक्य होईल. रेशन कार्डधारकांना वेळेत आणि योग्य प्रमाणात धान्य मिळण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागांतील नागरिकांनाही या आधुनिक सुविधांचा मोठा फायदा मिळणार आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे रेशन दुकानदारांनाही तांत्रिकदृष्ट्या सक्षम बनण्याची संधी मिळेल. ऑनलाईन मॉनिटरिंगमुळे भ्रष्टाचार आणि गैरव्यवहारांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. गरीब आणि गरजू नागरिकांना अन्नसुरक्षेचा अधिक विश्वासार्ह आणि सुलभ लाभ मिळावा, हा या योजनेमागील मुख्य उद्देश असल्याचं सरकारने स्पष्ट केलं आहे.

# कियाराच्या करिअरला ब्रेक?



कधीकाळी सलग हिट आणि ब्लॉकबस्टर चित्रपटांमुळे बॉक्स ऑफिसवर राज्य करणारी अभिनेत्री कियारा आडवाणी गेल्या काही वर्षांत मोठ्या हिटच्या प्रतीक्षेत आहे. तिच्या करिअरचा वेग मंदावल्याची चर्चा सध्या फिल्म इंडस्ट्रीत जोरात सुरू आहे. 'एम.एस. धोनी: द अनटोल्ड स्टोरी', 'कबीर सिंग' आणि 'भूल भुलैया २' यांसारख्या यशस्वी चित्रपटांमुळे कियाराने प्रेक्षकांच्या मनात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. मात्र, २०२२ नंतर तिच्या चित्रपटांना अपेक्षित यश मिळालेले नाही, अशी चित्रपट व्यापार विश्लेषकांची नोंद आहे. २०२२ मध्ये आलेल्या 'भूल भुलैया २'नंतर तिच्या प्रमुख किंवा सोलो भूमिकेतील कोणत्याही चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर मोठी कामगिरी केली नाही. त्यानंतर तिने साऊथ इंडस्ट्रीत पॅन-इंडिया प्रोजेक्ट्सकडे वळण्याचा प्रयत्न केला. दिग्दर्शक एस. शंकर यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या 'गेम चेंजर' या बिग बजेट चित्रपटात ती झळकली, ज्यात राम चरण मुख्य भूमिकेत होते. सुमारे ४५० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तयार झालेला हा चित्रपट अपेक्षांच्या तुलनेत कमी कामगिरी करू शकला. कमजोर पटकथा आणि दिग्दर्शनावर प्रेक्षकांनी नाराजी व्यक्त केल्याने चित्रपटाला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही, असे ट्रेड वर्तुळात सांगितले जाते. कियाराच्या अलीकडील चित्रपटांच्या कामगिरीकडे पाहता २०२२ हे तिच्या करिअरमधील शेवटचे मोठे यशस्वी वर्ष मानले जाते. त्यानंतर 'जुग जुग जियो' या मल्टीस्टारर चित्रपटाला मध्यम प्रतिसाद मिळाला, तर 'सत्यप्रेम की कथा'ला समीक्षकांकडून प्रशंसा मिळूनही व्यावसायिक यश मर्यादित राहिले. दरम्यान, 'वॉर २' या स्पाय थ्रिलरमध्येही ती झळकली होती, मात्र त्या चित्रपटालाही अपेक्षित यश मिळू शकले नाही, असे म्हटले जाते.आता तिच्या आगामी 'टॉक्सिक' या मोठ्या बजेट चित्रपटाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या चित्रपटातून कियाराला पुन्हा एकदा बॉक्स ऑफिसवर यश मिळेल का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.




# 'मर्दिनी'चा दमदार टीझर रिलीज

गेल्या काही दिवसांपूर्वी लोकप्रिय अभिनेत्री प्रार्थना बेहेरे हिच्या मर्दिनी चित्रपटाचे पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आले होते. यानंतर आता या चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. मर्दिनीचा अंगावर काटा आणणारा टीझर रिलीज करण्यात आला असून, प्रार्थना बेहेरेच्या पात्राची झलक दाखवण्यात आली आहे. जी चित्रपटाविषयी मोठी उत्सुकता निर्माण करते. अभिनेत्री एका वेगळ्याच भूमिकेत पाहायला मिळत आहे. या टीझरमध्ये आपल्या लेकरावर संकट आल्यानंतर एक सामान्य आई रौद्र रूप कसं धारण करते, याची अस्वस्थ करणारी झलक पाहायला मिळते. प्रार्थनाने मर्दिनी चित्रपटाचे पोस्टर शेअर करत सोशल मीडियावर पोस्ट लिहित घोषणा केली होती. आता मर्दिनीची झलक पाहून प्रेक्षक भारावून गेले आहेत. अभिनेत्री प्रार्थना बेहेरे हिने छोट्या पडद्यावरुन मोठ्या पडद्यावर एन्ट्री घेतली. तिच्या कॅाफी आणि बरंच काही चित्रपटाने मोठी लोकप्रसिद्धी तिला मिळवून दिली. या चित्रपटांनंतर तिने अनेक चित्रपटांमध्ये महत्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत.

# श्रीलीलाचा ग्लॅमरस अंदाज



दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री श्रीलीला पुन्हा एकदा तिच्या स्टायलिश आणि ग्लॅमरस लूकमुळे चर्चेत आली आहे. अभिनयासोबतच तिच्या फॅशन सेन्समुळेही ती नेहमीच चाहत्यांचं लक्ष वेधून घेत असते. सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या श्रीलीलाने नुकतेच काही खास फोटो शेअर केले असून तिच्या या नव्या अंदाजाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. श्रीलीलाने तिच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर स्ट्रॅपलेस फिटेड गाऊनमधील काही सुंदर फोटो पोस्ट केले आहेत. या फोटोंमध्ये ती अतिशय आत्मविश्वासपूर्ण आणि आकर्षक दिसत आहे. तिच्या या लूकने चाहत्यांना अक्षरशः भुरळ घातली आहे. अभिनेत्रीच्या फोटोंवर चाहत्यांकडून मोठ्या प्रमाणात लाईक्स आणि कमेंट्सचा वर्षाव होत आहे. श्रीलीलाच्या या गाऊनची खास गोष्ट म्हणजे त्यावरील फ्लोरल डिझाइन. पिवळा, पांढरा आणि काळा अशा रंगसंगतीत तयार करण्यात आलेल्या या ड्रेसवर सुंदर फुलांची नक्षी करण्यात आली आहे. त्यामुळे तिचा संपूर्ण लूक अधिक उठून दिसत आहे. या गाऊनला कॉर्सेट स्टाईल डिझाइन देण्यात आली असून त्यामुळे ड्रेसला एक वेगळाच स्टायलिश टच मिळाला आहे. या लूकला आणखी आकर्षक बनवण्यासाठी श्रीलीलाने केस मोकळे सोडले आहेत. त्यासोबतच तिने फ्लोरल डिझाइनचे स्टेटमेंट कानातले परिधान केले आहेत. साधा पण एलिगंट मेकअप आणि आत्मविश्वासपूर्ण पोझमुळे तिचा हा अंदाज सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अनेक चाहत्यांनी तिच्या सौंदर्याचं आणि स्टाईलचं कौतुक केलं आहे. श्रीलीला ही सध्या दक्षिण चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक चर्चेत असलेल्या अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. तिने तेलुगू आणि कन्नड चित्रपटांमध्ये काम करत कमी वेळात मोठं नाव कमावलं आहे. तिच्या अभिनयासोबतच डान्स आणि स्क्रीन प्रेझेन्सचंही नेहमी कौतुक होत असतं. त्यामुळे तिचा मोठा चाहतावर्ग तयार झाला आहे. अभिनयाइतकंच श्रीलीलाचं सोशल मीडिया प्रेझेन्सही मजबूत आहे. ती नेहमी विविध फॅशन लूकमधील फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असते. पारंपरिक साडीपासून मॉडर्न गाऊनपर्यंत प्रत्येक लूकमध्ये ती चाहत्यांना प्रभावित करताना दिसते. यावेळीही तिच्या फ्लोरल गाऊनमधील लूकने सोशल मीडियावर वेगळीच छाप पाडली आहे. दरम्यान, श्रीलीलाच्या आगामी चित्रपटांचीही चाहत्यांना उत्सुकता आहे. तिच्या स्टाईलसोबतच अभिनयाचीही चाहत्यांमध्ये कायम चर्चा असते. त्यामुळे तिचा प्रत्येक फोटो आणि पोस्ट काही क्षणांतच सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसतो.

# वैभव सूर्यवंशीचा जलवा WWE पर्यंत!

## ड्रयू मॅकइंटायरने घातली सूर्यवंशीच्या नावाची जर्सी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**वैभव सूर्यवंशीने यंदाच्या आयपीएलमध्ये आपल्या वादळी फटकेबाजीने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. अवघ्या १५ वर्षांच्या सूर्यवंशीने प्रत्येक सामन्यात नवेनवे विक्रम आपल्या नावे केले आहेत. दिग्गजांना मागे टाकत सर्वात कमी वयात अनेक विक्रम आपल्या नावे करणारा भारतीय खेळाडू म्हणून त्याने सर्वांचं लक्ष वेधलं. आता आयपीएल २०२६ मध्ये त्याचा संघ राजस्थान रॉयल्स प्लेऑफमध्ये पोहोचला असून एलिमिनेटर सामना खेळणार आहे. यापूर्वी एका WWE स्टारने त्याच्या नावाची जर्सी घालत त्याला पाठिंबा दर्शवला आहे.**



आयपीएल २०२६ च्या एलिमिनेटरमध्ये राजस्थान रॉयल्स व सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळवला जाणार आहे, हा सामना आज २७ मे रोजी न्यू चंदीगढमध्ये खेळवला जाईल. या सामन्यातील विजेता संघ गुजरात टायटन्सविरूद्ध दुसरा क्वालिफायर सामना खेळेल. तर पराभूत संघ स्पर्धेतून बाहेर होईल.

राजस्थानच्या या सामन्यापूर्वी WWE स्टार ड्रयू मॅकइंटायर याने वैभव सूर्यवंशीची जर्सी घालत व्हीडिओ शेअर केला आहे. खरंतर मॅकइंटायर क्रिकेटप्रेमी आहे. तो विशेषतः भारतीय क्रिकेट संघाचा चाहता आहे. त्याने अनेक मोठ्या प्रसंगी संघाला पाठिंबाही दिला आहे. पुन्हा एकदा, मॅकइंटायरने चाहत्यांची मनं जिंकली आहेत. यावेळी, तो १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या नावाची जर्सी घालून जिममध्ये वर्कआऊट करताना दिसला.

आयपीएल २०२६ सध्या भारतात चर्चेत आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरने गुजरातला हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. लवकरच राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात एलिमिनेटर सामना खेळला जाईल.वैभव सूर्यवंशीने राजस्थानकडून खेळताना धुमाकूळ घातला आहे.




# विराट कोहलीचं IPLचा किंग! रोहित शर्मालाही टाकलं मागे

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने गुजरात टायटन्सचा पहिल्या क्वालिफायर सामन्यात तब्बल ९२ धावांनी पराभव करत अंतिम फेरी गाठली आहे. आरसीबीने या सामन्यात इतिहासातील प्लेऑफमधील सर्वात मोठी धावसंख्या उभारली. विराट कोहली व देवदत्त पडिक्कल यांनी मोठ्या धावसंख्येचा पाया रचल्यानंतर रजत पाटीदार व इतर फलंदाजांनी २५४ धावांचा आकडा गाठला. यादरम्यान विराटने आयपीएल इतिहासातील अनोखा विक्रम आपल्या नावे केला.**



### एका हंगामात सर्वाधिक ६००+ धावा करणारे फलंदाज

विराट कोहली – ६ वेळा
केएल राहुल – ४ वेळा
डेव्हिड वॉर्नर – ३ वेळा
ख्रिस गेल – ३ वेळा
शुभमन गिल – ३ वेळा

विराट कोहलीने गुजरातविरूद्ध प्लेऑफमधील सामन्यात २५ चेंडूत ५ चौकार व एका षटकाराच्या मदतीने ४३ धावांची खेळी केली. यादरम्यान विराटने यंदाच्या आयपीएलमध्ये ६०० धावांचा पल्ला गाठला. ऑरेंज कॅपच्या शर्यतीत असलेल्या विराटने सातत्याने आयपीएल इतिहासात धावांचा पाऊस पाडला आहे. आता विराट कोहलीने सलग चौथ्या हंगामात ६०० धावांचा टप्पा पार केला.

विराट कोहली सलग चौथ्या हंगामात ६०० धावा करणारा आयपीएल इतिहासातील पहिलाच खेळाडू ठरला आहे. तर एकूण सहाव्यांदा विराटने ६०० धावांचा पल्ला गाठला. कोहलीने २०२३, २०२४, २०२५ आणि २०२६ या हंगामांमध्ये ६०० पेक्षा जास्त धावा केल्या. त्याने २०२३ मध्ये ६३९ धावा, २०२४ मध्ये ७४१ धावा, २०२५ मध्ये ६५७ धावा आणि २०२६ मध्ये ६०० धावा केल्या.



विराट कोहलीच्या या विक्रमाच्या जवळपासही कोणी नाहीये. कोहलीने सहा आयपीएल हंगामांमध्ये ६०० धावांचा टप्पा ओलांडला आहे. या यादीत दिल्ली कॅपिटल्सचा सलामीवीर केएल राहुल दुसऱ्या क्रमांकावर असून, त्याने चार हंगामांमध्ये ६०० किंवा त्याहून अधिक धावा केल्या आहेत. डेव्हिड वॉर्नर, ख्रिस गेल आणि शुबमन गिल यांनी प्रत्येकी तीन हंगामांमध्ये ६०० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत.

विराट कोहली आता आयपीएलमध्ये सर्वाधिक सामने खेळणारा खेळाडू बनला आहे. कोहलीने आयपीएलच्या इतिहासात २८२ सामने खेळले आहेत. तर रोहित शर्माने आयपीएलच्या इतिहासात २८१ सामने खेळले आहेत. आरसीबी यावर्षीच्या आयपीएलच्या अंतिम फेरीत पोहोचली आहे, त्यामुळे त्याला आणखी एक सामना खेळण्याची संधी मिळेल. रोहित शर्माचा संघ, मुंबई इंडियन्स स्पर्धेतून बाहेर पडला आहे, म्हणजेच रोहित त्याच्या आधीच्या स्थानावरच राहील.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरूवार ।
दि. 28 मे 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# जनगणना मोहिमेला गती; शहर विकासाला मिळणार दिशा

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

**देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि नागरी विकासासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या जनगणना प्रक्रियेत जनगणना कर्मचारी सक्रियपणे योगदान देत आहेत.**



शहरातील विविध विभागांतील कर्मचारी सध्या घरभेटीद्वारे माहिती संकलनाचे काम करत असून, अचूक आणि विश्वासार्ह माहिती नोंदविण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने मोहीम राबविली जात आहे. वाढती लोकसंख्या आणि बदलत्या नागरी गरजांच्या पार्श्वभूमीवर भविष्यातील विकास आराखडे तयार करण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची मानली जात आहे.

जनगणना ही केवळ लोकसंख्येची आकडेवारी गोळा करण्यापुरती मर्यादित नसून शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, वाहतूक, निवास, सार्वजनिक सुविधा आणि पायाभूत विकास यांसारख्या क्षेत्रांतील धोरणनिर्मितीसाठी आधारभूत ठरणारी व्यापक प्रक्रिया आहे. नागरिकांकडून संकलित होणाऱ्या माहितीच्या आधारे विविध शासकीय योजना आणि सेवा अधिक परिणामकारकपणे नियोजित केल्या जातात. त्यामुळे माहितीची अचूकता आणि नागरिकांचे सहकार्य या दोन्ही बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

शहरात निवडणूक आचारसंहितेची पार्श्वभूमी आणि काही प्रशासकीय निर्बंध असतानाही नागरिकांना दैनंदिन सेवा सुरळीत मिळाव्यात यासाठी महापालिका प्रशासनाने विभागनिहाय समन्वय आणि पर्यायी नियोजनावर भर दिला आहे. जनगणना जबाबदारी आणि नियमित नागरी सेवा यांचा समतोल राखत प्रशासनाकडून कामकाज सुरू ठेवण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

उन्हाळ्याची तीव्रता, बदलते हवामान आणि विस्तीर्ण नागरी क्षेत्र अशा विविध आव्हानांमध्येही जनगणना कर्मचारी सातत्याने घरभेटी घेऊन माहितीचे योग्य संकलन करत आहेत. अनेक भागांत नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून आवश्यक तपशील नोंदविले जात असून, या प्रक्रियेमुळे शहराच्या लोकसंख्याविषयक आणि सामाजिक वास्तवाचे अधिक अचूक चित्र समोर येण्यास त्यामुळे मदत होणार आहे.

महापालिका प्रशासनाने नागरिकांना जनगणना कर्मचाऱ्यांना आवश्यक सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. प्रगणक घरभेटीसाठी आल्यानंतर त्यांना योग्य आणि संपूर्ण माहिती द्यावी. तसेच जनगणना प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारचा ओटीपी मागितला जात नाही, त्यामुळे नागरिकांनी अफवा किंवा गैरसमजांना बळी न पडता अधिकृत जनगणना कर्मचाऱ्यांशी विश्वासाने सहकार्य करावे, असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

> “जनगणना ही केवळ सांख्यिकीय प्रक्रिया नसून शहर आणि देशाच्या विकासाचा मूलभूत आधार आहे. अचूक माहितीच्या आधारेच भविष्यातील पायाभूत सुविधा, नागरी सेवा आणि विविध विकास योजनांचे प्रभावी नियोजन करता येते. त्यामुळे नागरिकांनी जनगणना प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला आवश्यक सहकार्य करावे.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका.



# पिंपरी-चिंचवडकरांवर 'विषारी पाणी' पिण्याची वेळ!

## पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करा; मुख्यमंत्र्यांना सोसायटी फडरेशनचे पत्र

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प तातडीने सुरू करून पूर्ण करावा. त्यासाठी सदर प्रकल्पाचा समावेश अत्यावशक सार्वजनिक आरोग्य प्रकल्पात करावा, अशी जोरदार मागणी पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघाने केली आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवण्यात आले आहे.**




पिंपरी-चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष सचिन लोंढे यांनी यासंदर्भात सविस्तर निवेदन सादर केले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, २००९ मध्ये सुरू झालेला पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प २०११ पासून विविध कारणांमुळे रखडलेला आहे. सुरुवातीला सुमारे ३९८ कोटी रुपयांचा असलेला प्रकल्प आता तब्बल १७०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचे वृत्त समोर आले असून, हा विलंब म्हणजे नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर झालेला अन्याय असल्याचे महासंघाने नमूद केले आहे.

पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या ३२ लाखांवर पोहोचली असून हिंजवडी आयटी पार्क, MIDC औद्योगिक क्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि वाढत्या नागरी विस्तारामुळे शहराची पाण्याची गरज मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र उपलब्ध पाणीपुरवठा अपुरा पडत असल्याने भविष्यात गंभीर जलसंकट निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

सध्या शहरातील नागरिकांना ताथवडे व रावेत बंधाऱ्यातून येणारे दूषित आणि प्रदूषित पाणी वापरण्याची वेळ आली आहे. पवना नदीपात्रात सांडपाणी, रासायनिक पदार्थ आणि औद्योगिक घातक द्रव्ये मिसळत असल्याच्या बातम्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे त्वचारोग, पोटाचे विकार आणि इतर जलजन्य आजार वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे हजारो नागरिकांना महागडे टँकरचे पाणी विकत घ्यावे लागत असून गृहनिर्माण संस्थांवर दरमहा लाखो रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे महासंघाने स्पष्ट केले आहे. अनेक भागांमध्ये पाणीटंचाईमुळे नागरिक त्रस्त असल्याचेही नमूद करण्यात आले आहे, असा आक्षेपही महासंघाने नोंदवला आहे.

### महासंघाच्या मागण्या...

दरम्यान, मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी देखील हा प्रकल्प तातडीने मार्गी लावण्यासाठी सर्वपक्षीय बैठक बोलविण्याची मागणी केल्याचे महासंघाने स्वागत केले आहे. तसेच या बैठकीस पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघाला अधिकृत निमंत्रण देण्यात यावे, जेणेकरून नागरिकांची बाजू प्रभावीपणे मांडता येईल, अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच, महासंघाने मुख्यमंत्र्यांकडे पाच प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाला "अत्यावश्यक सार्वजनिक आरोग्य प्रकल्प" घोषित करणे, सर्वपक्षीय बैठक तातडीने बोलावणे, आवश्यक निधी व प्रशासकीय मंजुरी युद्धपातळीवर पूर्ण करणे आणि पवना धरणातून बंदिस्त जलवाहिनीद्वारे शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करणे यांचा समावेश आहे.




" पवना बंदिस्त जलवाहिनी हा केवळ पाणीपुरवठ्याचा प्रकल्प नाही, तर पिंपरी-चिंचवडकरांच्या आरोग्याशी आणि भविष्यासोबत जोडलेला जीवनावश्यक प्रश्न आहे. आम्ही कोणत्याही संघर्षाऐवजी संवाद, समन्वय आणि सकारात्मक तोडग्याच्या भूमिकेत आहोत. मावळातील शेतकरी बांधवांच्या भावना जपत आणि सर्व संबंधित घटकांना विश्वासात घेऊन हा प्रकल्प तातडीने मार्गी लागावा, हीच आमची अपेक्षा आहे. राज्य सरकारने आता ठोस निर्णय घेऊन शहरातील लाखो नागरिकांना सुरक्षित आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याचा हक्क द्यावा.

**- सचिन लोंढे, अध्यक्ष, पिंपरी चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघ.**

# अनिल मोरे हत्या प्रकरणाचा छडा! ४ आरोपींना बेड्या, मास्टरमाइंड अद्याप फरार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मोशी टोलनाक्याजवळील युवराज गार्डन हॉटेलमध्ये झालेल्या अनिल मारुती मोरे यांच्या निर्घृण हत्या प्रकरणाचा छडा लावण्यात भोसरी एम.आय.डी.सी पोलीस ठाण्याच्या तपास पथकाला यश आले आहे. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारांच्या मदतीने या गुन्ह्यातील ४ मुख्य आरोपींना अटक केली आहे.**



पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ मे २०२६ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास अज्ञात हल्लेखोरांनी मोशी टोलनाक्याजवळील युवराज गार्डन हॉटेलमध्ये अनिल मारुती मोरे यांच्यावर चाकूने सपासप वार करून त्यांचा खून केला होता. या प्रकरणी नागनाथ कुंडलिक चाटे (रा. हाफसे वस्ती, कुरुळी, ता. खेड) यांनी भोसरी एम.आय.डी.सी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी बी.एन.एस. कलम १०३(१), ४९, ६१ (२), २३८ (A), ३ (५) सह आर्म अ‍ॅक्ट आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने तपास चक्रे फिरवली. तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी १५ मे २०२६ रोजी चार आरोपींना अटक केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयाने २५ मे २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. या गुन्ह्यातील पाचवा आरोपी नितीन दिगंबर धोत्रे (रा. भोसरी) हा अद्याप फरार असून, त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची वेगवेगळी तपास पथके रवाना करण्यात आली आहेत.

ही कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) सारंग आवाड, अपर पोलीस आयुक्त (प्रादेशिक) बसवराज तेली, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ ३) मारुती जगताप, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) डॉ. शिवाजी पवार आणि सहाय्यक पोलीस आयुक्त सुधाकर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जामदार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) भोजराज मिसाळ, उपनिरीक्षक बालाजी जोनापल्ले आणि तपास पथकातील प्रशांत सोरटे, संजय जरे, चंद्रकांत गवारी, गणेश बोऱ्हाडे, चंद्रकांत असवले, स्वप्नील शेलार, राहुल लाखंडे, प्रविण मुळुक, बाजीराव सानप यांच्यासह इतर अंमलदारांच्या पथकाने केली. या गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जामदार करीत आहेत.

### अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे

१) नागेश लक्ष्मण काळे (वय २९, रा. शांतीनगर वसाहत, भोसरी)
२) अजय सर्जेराव गायकवाड (वय २०, रा. शांतीनगर वसाहत, भोसरी)
३) अजय सिकंदर आव्हाड (वय २७, रा. शांतीनगर वसाहत, भोसरी)
४) दत्ता चत्रभुज शिनगारे (वय ३०, रा. आंबेडकर वसाहत, लांडेवाडी, भोसरी)

# लोणावळ्याचा विकास वेगाने!

## रखडलेला उड्डाणपूल, तलाव सुशोभीकरणासह मोठ्या प्रकल्पांना गती

**महाईन्यूज । पुणे**

**पर्यटनवाढीसाठी महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना गती देण्यासोबतच शहरातील महत्त्वाचे रखडलेले प्रकल्प येत्या काळामध्ये पूर्णत्वास नेण्याचा मानस लोणावळा नगर परिषदेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, उपनगराध्यक्ष देविदास कडू, सर्व समित्यांच्या सभापती व नगरसेवक, नगरसेविका यांच्या वतीने पत्रकार परिषद घेत मागील साडेपाच महिन्यांच्या कालावधीमध्ये लोणावळा शहरामध्ये झालेली विकासकामे व पुढील काळामध्ये होणारी कामे यांचा आढावा जनतेसमोर मांडला.**




लोणावळा शहरांमधील अतिशय जिव्हाळ्याचा विषय असलेल्या भांगरवाडी ते नांगरगाव दरम्यानच्या रेल्वे उड्डाण पुलाच्या कामातील सर्व तांत्रिक अडथळे दूर करण्यात आले असून, पुढील सहा ते आठ महिन्यांमध्ये हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करू, असा विश्वास नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष देविदास कडू यांनी व्यक्त केला आहे. रेल्वे उड्डाण पुलाचे काम युद्धपातळीवर सुरू असून, देविदास कडू हे स्वतः या कामावर लक्ष ठेवून आहेत.

2019 साली या रेल्वे उड्डाण पुलाच्या पुढच्या कामाला सुरुवात झाली, त्या वेळी तत्कालीन पदाधिकारी व प्रशासन यांनी जागा भूसंपादन करण्याचा कोणताही विषय मार्गे न लावल्यामुळे पुढे जाऊन हे काम रखडले होते. आमदार सुनील शेळके यांच्या माध्यमातून या कामामधील सर्व तांत्रिक अडथळे व भूसंपादनाचे विषय मार्गी लावण्यात आले आहेत. पावसाळा सुरू होणार असल्यामुळे कामाचा वेग सध्या कमी राहील, मात्र सात ते आठ महिन्यांमध्ये या पुलाचे काम पूर्ण करत तो वाहतुकीसाठी खुला करू व नागरिकांना रेल्वे गेटच्या समस्येतून सुटकारा मिळवून देऊ, असा विश्वास या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आला आहे.

लोणावळा शहरातील विकासकामांचा आढावा नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे यांनी घेतला. वळवण महाविद्यालयासमोर एक्स्प्रेसवेच्या पुलाखाली गार्डन विकसित व सुशोभीकरण केले जाणार असल्याचे सांगितले. या ठिकाणी नमो उद्यान या योजनेअंतर्गत जाखमाता उद्यानाचे सुशोभीकरण केले जाणार असल्याची माहिती नगरसेविका अनिता अंभोरे यांनी दिली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासंदर्भातील माहिती नगरसेवक निखिल कवीश्वर यांनी दिली. महिला व बालकल्याण समिती सभापती स्वप्ना कदम यांनी महिला व मुलींसाठी घेण्यात येणाऱ्या विविध कोर्सेसची माहिती दिली.

### या स्थळांचा होणार विकास

खंडाळा तलाव व त्या परिसराचा पर्यटनात्मकदृष्ट्या विकास केला जाणार आहे. या ठिकाणी पसाट पद्धतीच्या लाईट्स लावल्या जाणार आहेत; तसेच स्वच्छतागृह, एसटीपी ही कामे केली जाणार असल्याची माहिती खंडाळ्याचे नगरसेवक जीवन गायकवाड यांनी दिली. त्या ठिकाणी वाहनतळासाठीदेखील जागा उपलब्ध केली जाणार आहे. वलवन तलाव यालादेखील पर्यटनात्मक दृष्ट्या सुशोभित केले जाणार आहे. यासाठी आठ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. येथे बोटिंग सुरू करण्याचा लोणावळा नगर परिषदेचा मानस आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेले छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे काम पूर्णत्वाकडे आले असून, विधान परिषदेची आचारसंहिता संपल्यानंतर या कामाच्या लोकार्पण केले जाणार आहे. नगर परिषद इमारतीसमोर महात्मा फुले भाजी मार्केट इमारतीचे काम केले जाणार आहे. या कामासाठी 65 ते 70 कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. नगर परिषदेच्या इमारतीमध्ये लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा पुतळा बसवण्यात येणार आहे.

# नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाकडून कर प्रणालीची पाहणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मालमत्ता कर व्यवस्थापन अधिक प्रभावी, पारदर्शक आणि महसूलवृद्धीस चालना देण्याच्या उद्देशाने नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाने आज पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाला भेट दिली. यावेळी उपायुक्त सचिन पवार यांनी या शिष्टमंडळाला पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मालमत्ता कर प्रणालीची सविस्तर माहिती दिली.**







पिंपरी चिंचवड महापालिकेचे उपायुक्त सचिन पवार यांनी मालमत्ता कर व्यवस्थापनातील विविध प्रक्रिया, महसूलवाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना तसेच तंत्रज्ञानाधारित प्रणालींबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, मालमत्ता कर व्यवस्थापन अधिक पारदर्शक, तंत्रज्ञानाधारित आणि नागरिककेंद्रित करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. डिजिटल प्रणाली, जीआयएस सर्वेक्षण आणि कार्यक्षम महसूल व्यवस्थापनाच्या माध्यमातून सेवा अधिक परिणामकारक करण्यावर आमचा भर आहे. विविध महापालिकांमध्ये अशा अभ्यासभेटी आणि अनुभवांची देवाणघेवाण झाल्यास प्रशासनातील उत्तम पद्धती एकमेकांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे महसूल व्यवस्थापन अधिक सक्षम होण्याबरोबरच नागरिकांना अधिक सुलभ, विश्वासार्हता आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे शक्य होते. स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकमेकांच्या यशस्वी उपक्रमांचा अभ्यास करून त्यांचा अवलंब करणे ही सकारात्मक आणि विकासाभिमुख प्रक्रिया आहे, असेदेखील त्यांनी सांगितले.

यावेळी नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाने मालमत्ता कर आकारणीची कार्यपद्धती, सर्वेक्षण व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया, लेटिंग रेट निर्धारण, महसूलवाढीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम, जनजागृती मोहिमा तसेच डिजिटल प्रणालींच्या वापराबाबत विशेष माहिती जाणून घेतली. तसेच जीआयएस आधारित सर्वेक्षण, थकबाकी वसुलीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना आणि नागरिकाभिमुख सेवा अधिक सक्षम करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देण्यात आली.

या अभ्यासभेटीमुळे दोन्ही महापालिकांमध्ये प्रशासनातील सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण होऊन अधिक कार्यक्षम, तंत्रज्ञानाधारित आणि नागरिकाभिमुख कर व्यवस्थापनाला चालना मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in